# जनसंपर्क अधिकारी

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट २४६- २३ दिनांक : - ०३/०८/२०२३

## जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने तलवारीने प्राणघातक हमला करून फरार आरोपीत यांना २४ तासांचे आत जेरबंद करण्यास तुळींज पोलीस ठाणेला यश

तुळींज पोलीस ठाणे हद्दीत दिनांक ०१.०८.२०२३ रोजी ००.४५ वा.च्या सुमारास जोहरा मस्जिद समोरील रोडवर प्रगतीनगर नालासोपारा पुर्व या ठिकाणी फिर्यादी नामे हुसेन अब्दुल रहमान शेख रा.१०१ रिया अपार्टमेंट प्रगतीनगर नालासोपारा पुर्व यांना संदल मिरवणुकीत झालेल्या भांडणाचा राग मनात धरून आरोपीत यांनी गैरकायद्याची मंडळी जमवुन तलवारीसारखे घातक हत्याराने वार करून जिवे ठार मारण्याच्या प्रयत्न केलेवरुन फिर्यादी यांनी दिलेले तक्रारीवरुन दिनांक ०१.०८.२०२३ रोजी २२.३५ वा. आरोपीत यांचेविरुध्द गुरनं. ५५५/२०२३ भादंविसं कलम ३०७, ३२६, ३२४, ५०४, १४१, १४३,१४४,१४८,१४९ सह आर्म ॲक्ट कायदा कलम ४,२५ सह मपोका कलम १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेवुन वरिष्ठांनी आरोपीत यांचा शोध घेवुन त्यांना तात्काळ अटक करणेबाबत मार्गदर्शन व सुचना केल्या होत्या. नमुद गुन्ह्यातील आरोपीत यांचे फिर्यादी यांना पुर्ण नाव व पत्ता माहित नसतानाही आरोपीत यांचे पुर्ण नाव पत्ता निष्पन्न करून, गुप्त बातमीदारमार्फत तसेच तांत्रिक माहितीच्या आधारे तपास आरोपीत नामे सलमान जमील खान उर्फ मेंटल वय २४ वर्षे रा. रूम नं. १११ बि. विंग सफल अपार्टमेंट हनुमान नगर नालासोपारा प. यास म्हाडा कॉलनी विरार प. येथुन व आरोपीत नामे अभिजीत महेंद्र टांग वय २१ वर्षे रा. रूम नं. १०२ श्रीप्रस्थ अपार्टमेंट फनफिस्टा नालासोपारा प. ता.वसई जि.पालघर यास वसई माणिकपुर येथुन ताब्यात घेवुन आरोपीतास यांना गुन्हा दाखल झाल्यापासुन २४ तासांचे आत अटक करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री. पौर्णिमा चौगुले-श्रींगी मॅडम पोलीस उप आयुक्त सो, परीमंडळ-२ वसई, श्री. विनायक नरळे सहाय्यक पोलीस आयुक्त सो, तुळींज विभाग, तुळींज पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेंद्र नगरकर, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. अमरसिंह पाटील, गुन्हे प्रकटिकरण शाखेचे स.पो.नि. एम.डी.म्हात्रे, पो.हवा. आनंद मोरे,उमेश वरठा, केंद्रे, पो.अं. कदम यांनी केलेली आहे.

----ooo-----